**कृपया प्रसिध्दीसाठी -** **12 फेब्रुवारी 2009**

## महिलांचा निर्धार

## देशात महागाई - मंदी आणणारी काँग्रेस नकोच !

**मुंबई, गुरुवार :** "गेल्या पाच वर्षात गहू, तांदूळाचे भावही दुपटीने वाढविणारी काँग्रेस पुन्हा हवी का" या भाजपा नेते श्री.राम नाईक यांच्या प्रश्नाला शेकडो महिलांनी एकमुखाने जोरदार "नको ! नको !" असे उत्तर दिले. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त चारकोप भाजपा वॉर्ड क्र.18 तर्फे भरविण्यात आलेल्या महिला मेळावा व हळदी कुंकू समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री.राम नाईक बोलत होते.

"पंडीत दीनदयाळ उपाध्याय यांनी दरिद्री नारायणाच्या सेवेची शिकवण दिली. वाजपेयी सरकारने म्हणूनच जीवनावश्यक वस्तूंचे भाव प्रयत्नपूर्वक आटोक्यात ठेवले" असे श्री.नाईक यांनी यावेळी आवर्जून सांगितले. वाजपेयी सरकारच्या काळात जीवनावश्यक वस्तूंचे भाव कसे होते आणि आता दर काय आहेत याचीही श्री.नाईक यांनी विस्ताराने माहिती दिली. सध्या रु.20 प्रति किलो ने मिळणारा गहू व रु. 22 ने मिळणारा तांदूळ मे 2004 मध्ये अनुक्रमे फक्त रु. 9 व रु.10 ला उपलब्ध होते. तसेच रु.32 ने मिळणारा गूळ व रु.23 ला मिळणारी साखर वाजपेयी सरकार असताना प्रत्येकी रु.14 ला मिळत होती, तर तेव्हा रु.80 प्रति किलो असणारी चहा पावडर आता रु.180 ला मिळत आहे; याची श्री.राम नाईक यांनी आठवण करुन दिल्यावर संतप्त महिलांनी 'आता काँग्रेस नकोच' चा निर्धार केला. देशात बोकाळलेली महागाई व मंदी यांची विस्तृत माहिती देणारे पत्रकच श्री.नाईक यांनी महिलांना घरोघर जाऊन प्रचार करण्यासाठी दिले.

भाजपा महिला मोर्चा, मुंबई च्या अध्यक्षा श्रीमती विंदा कीर्तिकर यांनी "भाजपाकडेच सर्वांत जास्त महिला खासदार आहेत, महिलांचे, कुटुंबांचे हित जपायचे असेल तर येत्या लोकसभा निवडणुकीत महिलांनी मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले पाहिजे" असे आवाहन केले. भाजपा उत्तर मुंबईचे अध्यक्ष व नगरसेवक श्री.योगेश सागर यांनी यावेळी बोलताना "राष्ट्रीय विकासाचा दर 10 टक्के करु अशी अर्थमंत्री डॉ.चिदंबरम् यांनी बढाई मारली, परंतु प्रत्यक्षात तो दर कमी होऊन अवघा 7.1 टक्के झाला आहे. सव्वा कोटी नोकरदारांवर बेकारीची कु-हाड कोसळली आहे. या परिस्थितीत सामान्य नागरिक महागाईचे ओझे कसे पेलणार" असा सवाल केला ! नगरसेविका श्रीमती शैलजा गिरकर यांचेही यावेळी भाषणे झाली. याखेरीज स्थानिक भाजपा महिला नेत्या श्रीमती लीना देहेरकर, श्रीमती दर्शना मलकान, श्रीमती सुनिता रेवाळे, आदी यावेळी उपस्थित होत्या.

श्रीमती ज्योती घोलप, श्रीमती संगिता पवार, श्री.योगेश पडवळ, आदींनी या समारंभाचे आयोजन केले होते.

**(कार्यालय सचिव)**

**संलग्न : महागाईबाबतचे दर पत्रक.**

**11 फेब्रुवारी 2009**
**पंडित दीनदयाल उपाध्याय पुण्यतिथी**

# भारतीय जनता पार्टी

***काँग्रेसचा हात, महागाईची साथ***
***जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किंमती***
***(किंमती मुंबईच्या दुकानातील आहेत - संकलक श्री. राम नाईक)***

| वस्तू | भाजपा सरकारच्या काळातील दर (प्रति किलो रु.) मे 2004 | काँग्रेस सरकारच्या काळातील दर (प्रति किलो रु.) 2 फेब्रुवारी 2008 | वाढ (% टक्के) |
|---|---|---|---|
| गहू | 9 | 20 | 122% |
| तांदूळ | 10 | 22 | 120% |
| साखर | 14 | 23 | 64% |
| चहा पावडर | 80 | 180 | 125% |
| खाद्य तेल | 40 (प्रति लिटर) | 86 (प्रति लिटर) | 115% |
| डालडा | 40 | 60 | 50% |
| मुग डाळ | 24 | 54 | 125% |
| मसूर डाळ | 22 | 68 | 209% |
| चणा डाळ | 25 | 42 | 68% |
| गूळ | 14 | 32 | 128% |
| बेसन | 20 | 48 | 140% |
| बटाटा | 8 | 12 | 50% |
| कांदा | 6 | 20 | 233% |
| टोमॅटो | 9 | 10 | 11% |
| दूध | 14 (प्रति लिटर) | 28 (प्रति लिटर) | 100% |
| केरोसीन | 18 (प्रति लिटर) | 25 (प्रति लिटर) | 39% |
| स्वयंपाकाचा गॅस | 244 (प्रति सिलेंडर) | 312 (प्रति सिलेंडर) | 29% |
| पेट्रोल | 33.15 (प्रति लिटर) | 44.60(प्रति लिटर) | 34% |
| डिझेल | 22.50 (प्रति लिटर) | 34.50 (प्रति लिटर) | 53% |

मुंबईचा ग्राहक मूल्य निर्देशांक (Consumer Price Index) श्री. अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारच्या काळात मे 2004 मध्ये 428 होता, तो डॉ. मनमोहन सिंह यांच्या काँग्रेस सरकारच्या कारकिर्दीत वाढून जून 2005 मध्ये 442 झाला, मग जून 2006 मध्ये तो 468 पर्यंत वाढला. जून 2007 मध्ये त्याने 496 वर उडी घेतली आणि मार्च 2008 ला तर तो 528 वर पोचला. ही निर्देशांकात झालेली वाढ 23 टक्के आहे. त्यानंतर **एप्रिल 2008 पासून ग्राहक मूल्य निर्देशांक प्रसिध्द करण्याचेच सरकारने बंद केले.**

याशिवाय घाऊक बाजारातील किंमतींच्या आधारे काढण्यात येणारा महागाई निर्देशांक वाढतोच आहे. 6 सप्टेंबर 2008 रोजी संपलेल्या आठवड्यात 12.14 टक्के वाढला होता. **गेल्या 16 वर्षात ही झालेली वाढ विक्रमी आहे.** आता महागाई निर्देशांक कमी होऊन 5.07 वर आलेला दिसत असला तरी तो घाऊक भावांवरुन काढण्यात येतो. सामान्य माणसाला जीवनावश्यक वस्तू प्रचंड महाग दरांनीच मिळत आहेत हे लक्षात घेतले पाहिजे.

दुसरीकडे तत्कालीन अर्थमंत्री डॉ. पी.चिदंबरम् यांनी 2008-09 चा अर्थसंकल्प सादर करतांना राष्ट्रीय विकासाचा दर (जीडीपी) कमीत कमी दोन आकडयात म्हणजेच 10 टक्क्यापेक्षा जास्त राहील अशी घोषणा केली होती. राष्ट्रीय विकासाचा दर ही कमी झाला असून या वर्षी 7.1 टक्के एवढाच राहील असे भारत सरकारनेच 9 फेब्रुवारी 2009 रोजी जाहीर केले आहे. **याचाच अर्थ देशामध्ये मंदीचा प्रभाव आहे हे स्पष्ट जाणवते आहे. भरीत भर म्हणून सव्वा कोटी नोकरदारांवर बेकारीची कु-हाड कोसळली आहे.** २५ लाख अर्धबेकार झाले आहेत. अशा परिस्थितीत दरवाढीचे ओझे सामान्य नागरिक कसे पेलणार ?

***भाजपा सरकार कसे होते आणि आता काँग्रेस सरकार कसे आहे याचा आपणच विचार करा !***